# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

सामान्य प्रशासन मुख्यालय

शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) ०२५१–२२०३६२१


महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणूचा (COVID-19) संसर्गजन्य प्रसार रोखण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना करणेबाबत.

संदर्भ : १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५.
२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम,१९५१.
३. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व महाराष्ट्र कोव्हीड–१९ उपाययोजना नियम, २०२०.
४. मोटार वाहन अधिनियम,१९८८.
५. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन अधिसुचना क्र. कोरोना २०२०, प्र.क्र.५८/आरोग्य–५, दि.१४.०३.२०२०.
६. जा.क्र.कडोंमपा/साप्र/मुका/टे.१/९२, दि.१९/४/२०२० रोजीचा आदेश.

## : आदेश :

जा.क्र.कडोंमपा/साप्र/मुका/टे.१/७११
दिनांक :– 23/०४/२०२०

संदर्भीत अधिनियम व महाराष्ट्र कोव्हीड–१९ उपाययोजना नियम २०२० चा नियम ३ नुसार महानगरपालिका आयुक्त यांना त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड–१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करणेसाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड–१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १९८७, दि.१३.०३.२०२० रोजी लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

उपरोक्त संदर्भिय आदेश क्र.६ अन्वये नागरीकांची होणारी गर्दी यावर प्रभावी नियंत्रण ठेवणेकामी दि.१०/०४/२०२० पासून दररोज सकाळी ५.०० वाजेपासून दुपारी २.०० वाजेपर्यंत **"मेडीकल स्टोअर्स, रूग्णालये/क्लिनीक, एलपीजी गॅस सिलेंडर, उद्‌वाहन (LIFT) दुरूस्ती वगळता"** सर्व जीवनावश्यक वस्तुची दुकाने सुरु राहतील असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

तथापि, कोरोना रूग्णाचा वाढता प्रार्दुभाव विचारात घेता कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील दररोज सकाळी ५.०० ते दुपारी २.०० या कालावधीमधे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील **"मेडीकल स्टोअर्स, रूग्णालये/क्लिनीक, एलपीजी गॅस सिलेंडर, उद्‌वाहन (LIFT) दुरूस्ती वगळता"** अन्य सर्व जीवनावश्यक वस्तु विक्री दुकाने व किराणा दुकानदार घरपोच माल (होम डिलिव्हरी) पोहोचविण्याची व्यवस्था करतील त्याच दुकानदारांना उक्त कालावधीमध्ये दुकाने सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे. तसेच या दुकानदारांनी त्यांच्या दुकानातील प्रत्यक्ष काऊंटरवर नागरिकांना मालाची विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

तसेच सदर परिसरातील नागरिकांना बाहेर जाऊन किराणा व अन्य जीवनावश्यक/अत्यावश्यक वस्तू खरेदी करण्यास प्रतिबंध करण्यात येत असून या परिसरातील नागरिकांनी त्यांना आवश्यक असलेल्या अत्यावश्यक वस्तु या घरपोच सेवा देणा–या दुकानादारांकडून प्राप्त करून मागविण्यात याव्यात.

घरपोच सुविधा देण्याची व्यवस्था न केलेल्या दुकानदारांनी दुकाने चालू ठेवल्यास त्यांचे विरूध्द गुन्हे नोंदविण्यात येतील.

तसेच भाजीपाला, फळ विक्रेते यांनी त्यांच्या मालाची विक्री एका ठिकाणी बसून न करता हातगाडीवर फिरून करण्यात यावी.

Scanned by CamScanner

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

सामान्य प्रशासन मुख्यालय

शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) ०२५१–२२०३६२१

ग्राहकांना घरपोच सेवा उपलब्ध करुन देणेकामी किराणा दुकानदार आणि भाजीपाला व फळे विक्रेते यांची माहिती www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी नागरीकांनी घरपोच सेवा देणाऱ्या दुकानदार आणि भाजीपाला व फळ विक्रेते यांच्याकडूनच मालाची खरेदी करावी. जीवनावश्यक वस्तुंच्या खरेदीसाठी घराबाहेर पडू नये.

ग्राहकांना घरपोच सेवा उपलब्ध करुन देणेकामी मनुष्यबळाची कमतरता असल्यास दुकानदारांनी स्वयंसेवक उपलब्ध करुन घेणेकामी संबंधित प्रभागक्षेत्र अधिकारी व वॉर रूम हेल्पलाईन क्रमांक – ०२५१–२२११३७३ वर संपर्क साधावा.

१) अ प्रभाग क्षेत्र अधिकारी–९५९४८३७७३१
२) ब प्रभाग क्षेत्र अधिकारी–९८१९४११४९१
३) क प्रभाग क्षेत्र अधिकारी–९९६७७७५६७०
४) जे प्रभाग क्षेत्र अधिकारी–९९६७९१४३८३
५) ड प्रभाग क्षेत्र अधिकारी–९९६९३३६८३२
६) फ प्रभाग क्षेत्र अधिकारी–९८१९५०४३०४
७) ह प्रभाग क्षेत्र अधिकारी–८३५६८८८३००
८) ग प्रभाग क्षेत्र अधिकारी–८९८३०००३६९
९) आय प्रभाग क्षेत्र अधिकारी–९८६९४३३२८०
१०) ई प्रभाग क्षेत्र अधिकारी–९८२२७७६०८५

संबंधित व्यावसायीक आस्थापना व दुकाने यांचे मालक वा संबंधितांनी या आदेशाचे उल्लंघन केल्यास ते भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम, १८८ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहतील. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

(डॉ.विजय सूर्यवंशी)
सक्षम अधिकारी तथा,
आयुक्त,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका.

प्रति,

१) उप आयुक्त (बाजार व परवाना विभाग)
२) संबधित प्रभागक्षेत्र अधिकारी, क.डों.म.पा.

**प्रत : माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.**

१. पोलीस उपायुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
२. सहा.पोलीस आयुक्त, डोंबिवली.

Scanned by CamScanner